# ANAMPREM
# SEP - 2025 NEWSLETTER

## अनामप्रेम स्नेहवार्ता

www.anamprem.org　　　　मासिक पत्रिका - 2025

### नगरची राष्ट्रीय गोलबॉल स्पर्धेत उत्तुंग भरारी
## 'अनामप्रेम'ची कल्पना कदम उत्कृष्ट राष्ट्रीय खेळाडू



समाचार/नगर-दि.१

राष्ट्रीय स्तरावरील अंध गोलबॉल स्पर्धा नुकत्याच महाराष्ट्रातील गोंदिया येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये दिल्ली, हरियाणा, मध्य प्रदेश, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, गुजरात यासह देशातल्या विविध राज्यांच्या टीमने भाग घेतला होता.

या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या महाराष्ट्राच्या महिला संघाकडून अनामप्रेमची विद्यार्थिनी कल्पना कदम व पुरुष संघाकडून अनामप्रेमचा विद्यार्थी आनंद माळवे यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केले. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या महिला व पुरुष या दोन्ही संघांनी अभिमानास्पद कामगिरी करत विजेतेपद मिळवले आहे.

या संपूर्ण स्पर्धेत सातत्याने उत्कृष्ट खेळ करून महाराष्ट्राच्या संघाला अजिंक्यपद मिळवुन देणारी अनामप्रेमची विद्यार्थिनी कल्पना कदम हिला उत्कृष्ट राष्ट्रीय खेळाडू हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या संपूर्ण स्पर्धेमध्ये कल्पनाने प्रतिस्पर्धी संघा विरुद्ध २५ गोल केले. यात तामिळनाडू विरुद्ध १० पैकी ८, मध्य प्रदेश विरुद्ध ७ पैकी ६, दिल्ली विरुद्ध १२ पैकी ७, आणि हरियाणा विरुद्ध ९ पैकी ४ गोलचा समावेश आहे.

यावेळी झालेल्या सत्कार समारंभात राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित खेळाडू नेहा नलिन पावसकर यांच्या हस्ते अनामप्रेमच्या या दोन्ही खेळाडूंना पुरस्कार प्रदान करण्यात आला. पावसकर यांनी अनामप्रेम संस्था अंध, अपंग, मूक-बधिर व अस्थिव्यंग या प्रवर्गासाठी करत असलेल्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. अनामप्रेमचे दोन्ही खेळाडू कल्पना कदम व आनंद माळवे यांना महाराष्ट्र गोलबॉल संघाच्या कोच आरती लिमजे, विजय नाईक, व्यवस्थापक सुवर्णा जोशी, अनामप्रेमचे अभय रायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. स्नेहालय-अनामप्रेम परिवारातर्फे या दोन्ही खेळाडूंचे उद्योजक अरुण, डॉ. गिरीश कुलकर्णी, इंजि. अजित माने, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. प्रकाश, डॉ. मेघना मराठे, अनिल गावडे, डॉ. रविंद्र सोमाणी, डॉ. हेमंत देशपांडे, डॉ. सुचित तांबोळी, इंजि. राधाताई कुलकर्णी, गोपीनाथ सरफरे, डॉ. सायली सतीश सोमण, रो. नितीन थाडे, अविनाश बोपर्डीकर, सी.ए. अशोक पितळे, दीप्तीताई सोंदे यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.




नवी दिल्ली येथे राष्ट्रीय पातळीवर आयोजित नॅशनल पॅरा योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप 2025-26 या स्पर्धेत अनामप्रेमची कन्या कु. कल्पना कदम हिने अंध विभागातून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक (Gold Medal) मिळवले आहे.

कल्पनाच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण अनामप्रेम-स्नेहालय परिवार अभिमानाने गौरवलेला आहे.

कल्पनाचे हे यश तिच्या परिश्रम, चिकाटी आणि संस्थेच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचे उत्तम उदाहरण आहे.

अनामप्रेम परिवाराकडून कल्पनाचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!



मुंबई ग्राहक पंचायत आयोजित "सेतू बांधा रे" कार्यक्रमात अंधेरी येथील स्टॉलवर महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री मा. उदय सामंत साहेब यांचा अनामप्रेम संस्थेच्या वतीने बुके देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी आपल्या भाषणात मा. सामंत साहेबांनी अनामप्रेम संस्थेच्या कार्याचा विशेष उल्लेख करत, दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन क्षेत्रातील संस्थेच्या योगदानाचे कौतुक केले.

त्यांच्या या शब्दांनी अनामप्रेम परिवाराला नवी प्रेरणा मिळाली.




Scanned with OKEN Scanner

# SEPTEMBER- Highlights






## गौरवाचा क्षण – आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित गौरांग शाळेचे विशेष शिक्षक मा.श्री. रामू बाडेबुचे

**शिक्षणाच्या प्रकाशात स्वतःचा मार्ग शोधणाऱ्या आणि इतरांसाठी तोच मार्ग उजळवणाऱ्या व्यक्तींपैकी एक म्हणजे अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळेचे दृष्टिहीन विशेष शिक्षक मा. रामू बाडेबुचे सर.**

**दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी, समीर भाई फ्रेंड सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने, शिक्षण क्षेत्रातील मोलाच्या व प्रेरणादायी योगदानाबद्दल "आदर्श शिक्षक पुरस्कार" देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.**

**रामू सर स्वतः दृष्टिहीन असूनही, आपल्या जिद्द, आत्मविश्वास आणि सेवाभावी वृत्तीच्या जोरावर अनेक दृष्टिहीन विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा दिवा पेटवत आहेत. ब्रेल लिपीद्वारे वाचन–लेखन शिकवण्याचे त्यांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे माध्यम बनले आहे.**

**त्यांची अध्यापनशैली, प्रेमळ संवाद, आणि प्रत्येक विद्यार्थ्यावरील विश्वास हीच त्यांच्या यशाची खरी ओळख आहे. रामू सरांचा हा सन्मान म्हणजे प्रेरणेचा दीप — जो सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि समाजासाठी मार्गदर्शक ठरेल.**



## अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेत शिक्षक दिन साजरा

अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात, आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला.
या विशेष दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षकांना शुभेच्छा देत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी तयार केलेले सांस्कृतिक कार्यक्रम, कविता, व नाटिका यांमधून शिक्षकांप्रती असलेले प्रेम आणि आदर सुंदरपणे व्यक्त झाला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सन्मान फुलांच्या गुच्छाने व हस्तनिर्मित शुभेच्छा पत्रकाद्वारे केला.
शिक्षक म्हणजे प्रेरणेचा दीप, जो विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देतो, जीवन मूल्यांचा संस्कार करतो आणि उज्ज्वल भविष्याचा पाया रचतो.

हा दिवस शिक्षकांच्या समर्पण, त्याग आणि आदर्श समाजनिर्मितीतल्या मोलाच्या योगदानाची जाणीव करून देणारा ठरला.





Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM Highlights

www.anamprem.org



## एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या शिबिरात अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या वतीने गांधी मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या नेत्र तपासणी व आरोग्य शिबिरात अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेतील विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी नेत्र तपासणीसह डोळ्यांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन प्राप्त केले.
तज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना दृष्टीसंवर्धन, स्वच्छता आणि योग्य नेत्र काळजीचे महत्त्व समजावून सांगितले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढली असून, गौरांग शाळेद्वारे आयोजित आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये हे एक प्रेरणादायी पाऊल ठरले आहे.



## प्राथमिक आरोग्य केंद्राच्या टीमची गौरांग शाळेस आरोग्यजागृती भेट..!

अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अधिकारी डॉ. ज्योती किसन शिंदे आणि त्यांच्या आरोग्य सेवकांच्या टीमने भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना गोवर, रूबेला, डेंगू आणि मलेरिया यांसारख्या साथीच्या रोगांबाबत उपयुक्त माहिती दिली तसेच या आजारांपासून बचावासाठी आवश्यक काळजी आणि प्रतिबंधात्मक उपाय समजावून सांगितले.

त्यांनी "कोरडा दिवस पाळण्याचे महत्त्व" स्पष्ट करत परिसर स्वच्छ ठेवण्याचे आणि डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी सामूहिक जबाबदारी घेण्याचे आवाहन केले.

या आरोग्यजागृती उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आरोग्यसाक्षरतेचे भान प्राप्त झाले असून, शाळेच्या आरोग्यविषयक उपक्रमांना नवी दिशा मिळाली आहे.



अनामप्रेम मराठवाडा प्रकल्पास श्री. एस. समशेरसिंग सोढी, मेंबर – महाराष्ट्र स्टेट मायनॉरिटीज कमिशन यांची भेट झाली.
संस्थेच्या कार्याचे कौतुक करत त्यांनी सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.तसेच दरमहा किराणा मदत व मान्यवरांचे वाढदिवस संस्थेत करणे हा उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली.



निवृत्त न्यायाधीश श्री. शशिकांत कुलकर्णी सरांची अनामप्रेम मराठवाडा प्रकल्पास भेट. यावेळी डॉ.गिरीश कुलकर्णी सरांविषयीच्या सुंदर आठवणींना उजाळा मिळाला



Scanned with OKEN Scanner




**स्नेहालय संस्थेमध्ये विशेष शासकीय सेवा कॅम्प – अनामप्रेम विद्यार्थ्यांचा लाभदायी सहभाग..**

स्नेहालय संस्थेच्या वतीने विविध शासकीय योजना आणि सेवा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने एक विशेष शासकीय सेवा कॅम्प आयोजित करण्यात आला.

या कॅम्पमध्ये संजय गांधी निराधार योजना, रेशन कार्ड योजना आणि आधार कार्ड अपडेट सेवा यांचा समावेश करण्यात आला होता.

या उपक्रमादरम्यान अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेतील १५ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड यशस्वीपणे अपडेट करण्यात आले तसेच २ विद्यार्थ्यांना नवीन रेशन कार्ड मिळवून देण्यात आले.

या शिबिरामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक शासकीय सेवा सुलभपणे उपलब्ध झाल्या असून, त्यांच्या शालेय कामकाज आणि वैयक्तिक ओळखपत्र संबंधित अडचणी दूर करण्यात मदत झाली आहे.





दि. 14 सप्टेंबर 2025 रोजी अनामप्रेम हिम्मतभवन प्रकल्पास मा. दिव्या वर्मा (उपजिल्हाधिकारी, अहिल्यानगर), मा. मधुरीका वर्मा (असिस्टंट प्रोफेसर, संभाजीनगर), कु. रिचा उगाडे (क्रिकेट कोच, संभाजीनगर) आणि श्री. प्रमोद उगाडे (क्रिकेट कोच, संभाजीनगर) यांनी भेट दिली.
या भेटीदरम्यान पाहुण्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहन दिले तसेच सर्व विद्यार्थ्यांना टी-शर्ट व नाईट पॅन्टचे वाटप केले.
संस्थेच्या कार्याविषयी व विविध उपक्रमांविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास व प्रगतीचे कौतुक केले.




Scanned with OKEN Scanner




गणेशोत्सवाच्या शुभ निमित्ताने अनामप्रेम हिम्मतभवन वस्तीगृहातील विद्यार्थ्यांसाठी उत्साहवर्धक गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मा. इंजि. अजित माने हे उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी आपल्या सुमधुर आवाजातून भक्तीमय,आनंदाचा सुरेल संगम साकारला. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि कलागुण उजागर झाले.




अनामप्रेम संस्थेच्या कौशल्य विकास विभागातील दिव्यांग विद्यार्थी यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या विविध आकर्षक वस्तूंचा स्टॉल इन्फोसिस कंपनी व इतर 9 ठिकाणी लावण्यात आला.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थी व लाभार्थी यांनी केवळ आपल्या कलागुणांचे दर्शनच घडवले नाही, तर आत्मनिर्भरतेचा आणि स्वाभिमानाचा सुंदर संदेशही दिला.




अनामप्रेम संस्थेच्या विविध प्रकल्पांचे चित्रण करण्याचे कार्य श्री. गारोळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले.
दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण व रोजगारासाठी संस्थेने केलेल्या कार्याची झलक अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने ही चित्रफीत तयार करण्यात येत आहे.
लवकरच सुमारे दहा मिनिटांची प्रेरणादायी डॉक्युमेंटरी सर्वांसमोर सादर होणार आहे.




"सेवेचा सन्मान – पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त अनामप्रेममध्ये फलवाटप उपक्रम"

दिनांक 17/09/2025 रोजी पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी मंडळाचे मान्यवर पदाधिकारी यांनी अनामप्रेम हिम्मतभवन वस्तीगृहाला भेट दिली.
या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना फळांचे वाटप केले.




Scanned with OKEN Scanner



अनामप्रेम संचलित “प्रकाशगान संगीत रजनी मंच” तर्फे दिव्यांग मुलांचा भव्य ऑर्केस्ट्रा कार्यक्रम आनंद धाम परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात पार पडला.
या कार्यक्रमाला नगरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.
संगीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे अप्रतिम सादरीकरण करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.
या उपक्रमामुळे अनामप्रेम संस्थेचे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचले आणि समाजात संवेदनशीलतेचा व प्रेरणेचा सुंदर संदेश दिला गेला.



**सामाजिक कार्यकर्ते व स्नेहालयचे विश्वस्त श्री. दीपक पापडेजा सर यांनी अनामप्रेम हिम्मतभवन वस्तीगृहाला भेट देऊन तेथील दिव्यांग विद्यार्थ्यांना अवयवदानाचे महत्त्व समजावून सांगितले.**
**त्यांनी अवयवदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकतेचा संदेश दिला.**
**या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, सामाजिक जबाबदारी आणि प्रेरणादायी विचारांची रुजवात झाली.**




**अनंत चतुर्दशी निमित्त दरवर्षीप्रमाणे हॉटेल जय आनंद तर्फे अनामप्रेम संस्थेसाठी अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला.**
**या सेवाभावी उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा आणि संवेदनशीलतेचा उत्तम संदेश देण्यात आला.**
**संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभागी होत या दिवसाचे पवित्र औचित्य अधिक मंगलमय केले.**



**अनामप्रेम संस्थेच्या सर्वच प्रकल्पांमध्ये श्री गणरायांची मंगलमय आरती समाजातील विविध मान्यवरांच्या हस्ते मोठ्या श्रद्धा व उत्साहात संपन्न झाली.**

Scanned with OKEN Scanner

## ANAMPREM Visitors














## श्रम ही श्रीराम हमारा





## घरपोहच किराणा किट योजनेअंतर्गत नगर तालुक्यातील गरजू दिव्यांगांना किराणा किटची मदत.



## Hostel Activity





Scanned with OKEN Scanner

स्थापना 2005

अनामप्रेम

# अनामप्रेम - आधारग्राम

## यशवंत प्रकल्प स्पायनल कॉर्ड इंजुरी सेंटर

**SEPTEMBER - 2025**








**अनामप्रेम यशवंत प्रकल्प - स्पायनल कॉर्ड इंजुरी पुनर्वसन केंद्रात उपचार घेत असलेले पेशंट.**

**सप्टेंबर महिन्यात Y4J प्रशिक्षण केंद्रामार्फत एकूण 23 दिव्यांग विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून पुणे, बारामती आणि छत्रपती संभाजीनगर येथे रोजगार मिळवला आहे.**
**ही कामगिरी अनामप्रेम परिवाराच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दीची प्रेरणादायी साक्ष आहे.**



Scanned with OKEN Scanner

# KALPANA




## जिद्दीच्या पंखांनी नवनवीन यशोशिखरे पादाक्रांत करणारी सक्षमा - कल्पना पंजाबराव कदम...

"प्रत्येक अडथळा ही संधी असते, स्वतःला सिद्ध करण्याची." ही ओळख पटवून देणारी , एक जिद्दी, संघर्षशील आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असलेली कल्पना हिचा जन्म ८ जून २००३ रोजी नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील सापटी गावात एका साध्या कुटुंबात झाला. वडील पंजाबराव वामनराव कदम आणि आई रत्नमाला पंजाबराव कदम हे दोघेही शेतमजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. तीन बहिणी आणि एक लहान भाऊ असलेल्या या कुटुंबात, कल्पना ही एकमेव अपंगत्व (अंशतः अंध) असलेली मुलगी आहे, ती देखील जन्मतःच.

"कल्पनाचे बालपण आणि शिक्षण"...

कल्पनाने आपले १ली ते ७वी पर्यंतचे शिक्षण रेणुकाबाई जाधव अंध विद्यालय, पोफाळी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ, महाराष्ट्र येथे पूर्ण केले. या शाळेत अंध व मुकबधीर विद्यार्थी असल्याने तिचे बालपण याच मुलांच्या सहवासात गेले. या शाळेत तिला मुकबधिरांसाठी असलेली सांकेतिक भाषा (sign language) शिकण्याची संधी मिळाली. त्याचवेळी तिच्या मनात एक बीज पेरलं गेलं कि, "आपण मुकबधिर विद्यार्थ्यांची शिक्षिका व्हायचं!" पुढील शिक्षणासाठी तिने नांदेडला स्थलांतर केलं. ८वी ते १०वी पर्यंतचे शिक्षण मल्टीपर्पज हायस्कूल, नांदेड येथे आणि त्यापुढील महाविद्यालयीन ११वी ते १२वी पर्यंतचे शिक्षण स्व. गंगाराव पिंपटवार कनिष्ठ महाविद्यालय, नांदेड येथे तिने पूर्ण केलं.

"स्वप्न आणि संघर्ष"...

कल्पनाला लहानपणापासून अंध व मूकबधिर असलेल्या मुलांमध्ये रमायला आवडायचं. त्यांच्या शाळेत राहून त्यांची भाषा, त्यांचे हावभाव, त्यांचा संघर्ष हे सगळं अनुभवताना तिच्या मनात एक सेवाभाव निर्माण झाला. तिला मुकबधीर विद्यार्थ्यांची शिक्षिका केवळ नोकरीसाठी नव्हे, तर त्यांच्यात काहीतरी सकारात्मक बदल घडवण्यासाठी व्हायचे आहे. अपंगत्व आणि ग्रामीण पार्श्वभूमी असतानाही ती हार न मानता आपल्या स्वप्नपूर्तीसाठी सातत्याने मेहनत करत होती. मात्र, शिक्षिका होण्यासाठी कोणता मार्ग निवडावा याचे स्पष्ट मार्गदर्शन तिला मिळत नव्हते.

"अनामप्रेम संस्थेमधे कल्पनाचा प्रवेश"...

कल्पनाला तिच्या मैत्रिणीच्या व्हाट्सअॅप वरुन अनामप्रेम आयोजित करत असलेल्या MS-CIT संगणक कोर्सविषयी माहिती मिळाली. तिने संस्थेशी संपर्क केला, प्रवेश निश्चित केला आणि ती या कोर्ससाठी अनामप्रेम मध्ये दाखल झाली. तिला संस्थेतील वातावरण, शिक्षण, सुरक्षितता, सुविधा भावल्यामुळे तिने उच्च महाविद्यालयीन शिक्षण अनामप्रेमच्या वसतिगृहात राहुन घेण्याचे ठरविले. कल्पनाला पूर्वीपासूनच एक अनामिक भिती वाटत होती. तिला नेहमी एकटं एकटं वाटायचं त्यामुळे ती बऱ्याच वेळा उदास असायची. तिला अभ्यासाव्यतिरिक्त इतर कामाची काही विशेष आवड नव्हती. थोड्याशा ताण-तणावाने देखील ती आजारी पडायची. तिची ही अवस्था पाहून अनामप्रेमचे संचालक अभय रायकवाड आणि विश्वस्थ डॉ. मेघना मराठे यांनी वेळोवेळी तिचे समुपदेशन करुन, तिच्या पालकांची भूमिका घेऊन तिला त्या परिस्थितीतून व्यवस्थितपणे बाहेर काढले.



Scanned with OKEN Scanner

"स्वप्नपूर्ती"...

अनामप्रेम संस्थेचा भक्कम आधार मिळाल्यामुळे कल्पनात खूपच सकारात्मक बदल झाले, तिचा आत्मविश्वास वाढला, तिच्यात धाडस निर्माण झाले. विविध कामांची तिला आवड निर्माण झाली, ती स्वयंपाकासारखी कामे शिकली. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संस्थेने तिला तिचे स्वप्न साकार करण्याची संधी दिली. तिला मुकबधीर भाषेतून विशेष शिक्षक होण्यासाठी D.Ed. कोर्सला प्रवेश घेऊन दिला. यावर्षी (2025) कल्पनाने D.Ed. (Special Education – Hearing Impairment) कोर्स चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केला आहे. तिच्या या शैक्षणिक खर्चासाठी We Us and Our Foundation, डॉ. प्रकाश शेठ, इंजि. अजित माने, सौ. मीना बेदरकर, सौ वैशाली शाह यांनी मोलाची मदत केली. ज्या कल्पनाला शिक्षिका होण्याचा मार्ग दिसत नव्हता तीच कल्पना आज मुकबधीर विद्यार्थ्यांची विशेष शिक्षिका झाली आहे. ती आता आत्मविश्वासाने म्हणते, "अनामप्रेमने माझ्या पंखांना बळ दिले. हो, आता मी काहीही करु शकते."

"शून्यापासून शिखरापर्यंत यशस्वी मार्गक्रमण...गोलबॉल आणि योगामधील नेत्रदीपक कामगिरी"

कल्पनाची आणखी एक आवड होती, ती म्हणजे मैदानी खेळ. शालेय जीवनात तिला ही संधी कधीच मिळाली नव्हती. मात्र, अनामप्रेम मध्ये आल्यावर ही संधी तिला मिळाली आणि खूप चांगले समर्थन देखील मिळाले. अंध खेळाडूंसाठी असणाऱ्या गोलबॉल खेळाची सुरुवात कल्पनाने प्रथमतः अनामप्रेम संस्थेने आयोजित केलेल्या पहिल्या राज्यस्तरीय गोलबॉल स्पर्धेपासून केली. या खेळाची तिला अजिबात माहिती नव्हती, परंतु संस्थेतील तिचे पालक अभय रायकवाड यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे तीने या स्पर्धेमध्ये भाग घेतला आणि चांगला खेळ केला. तिच्या या खेळाच्या जोरावर तिला पॅरा गोलबॉल स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र यांच्याकडून मुंबईमध्ये राज्यस्तरीय निवड चाचणी मध्ये बोलविण्यात आले. मुंबईत तिला राष्ट्रीय खेळाडू नेहा पावसकर, आरती लिमजे व सुनील सवने यांचे मार्गदर्शन मिळाले आणि तिची महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली. महाराष्ट्र संघाकडून सहारनपुर, उत्तर प्रदेश येथे ती राष्ट्रीय गोलबॉल स्पर्धेमध्ये सहभागी झाली. पहिल्यांदाच तिला बाहेरच्या राज्यात खेळण्याचा अनुभव या स्पर्धेमुळे आला. तिच्या खेळाच्या जोरावर या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचा दुसरा क्रमांक आला. सन 2024 मध्ये मुंबईत झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत अनामप्रेम टीमकडून खेळताना तिने आरती व इंदू यांच्या साथीने अनामप्रेमला अजिंक्यपद मिळवून दिले. या राज्यस्तरीय स्पर्धेत तिला उत्कृष्ट खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. तसेच गोंदिया, महाराष्ट्र येथे झालेल्या राष्ट्रीय गोलबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून तिची संघाची कर्णधार म्हणून निवड करण्यात आली. ही निवड सार्थ ठरवत तिने गोंदिया येथे डिसेंबर 2024 मध्ये झालेल्या राष्ट्रीय गोलबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाला अजिंक्यपद प्राप्त करून दिले. महाराष्ट्र संघाकडून खेळताना तिने प्रतिस्पर्धी संघांवर एकूण 25 गोल करत सर्वोत्तम कामगिरी केली. या अभिमानास्पद कामगिरीच्या जोरावर तिची उत्कृष्ट राष्ट्रीय खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. ऑगस्ट 2025 मध्ये इजिप्त येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी देखील तिची निवड झाली होती. परंतु इजिप्तला जाण्यासाठी येणारा खर्च हा तिच्या व संस्थेच्या आवाक्या बाहेरचा असल्याने दुर्दैवाने ती या आंतरराष्ट्रीय सामन्यास जाऊ शकली नाही. जबरदस्त खेळ करण्याची क्षमता व अंगीभुत नेतृत्व गुण असताना देखील केवळ आर्थिक सक्षमता नसल्याने तिला या आंतरराष्ट्रीय सामन्यातून माघार घ्यावी लागली.

कल्पना योगासनामध्ये सुद्धा निपुण आहे. ती सध्या महाराष्ट्र पॅरा योगासन संघाचे राज्य पातळीवर प्रतिनिधित्व करत आहे. 26 ते 28 सप्टेंबर 2025 रोजी नवी दिल्ली येथे राष्ट्रीय पातळीवर आयोजित केलेल्या नॅशनल पॅरा योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप 2025-26 या स्पर्धेत तिने अंध विभागातून सर्वोत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक प्राप्त करून देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. योगासनामध्ये सुद्धा ती आता भारताचे प्रतिनिधित्व आंतरराष्ट्रीय स्तरावर करणार आहे. परंतु इथे देखील तिला आर्थिक संकटाचा सामना करावा लागणार आहे. भारत देशाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्वल करु पाहणाऱ्या या जिद्दी आणि गुणी दिव्यांग खेळाडूला प्रायोजकाची नितांत आवश्यकता आहे.

कल्पना म्हणते "शून्यातून आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून झालेला माझा प्रवास केवळ अनामप्रेममुळे शक्य झाला आहे. मी मनापासून प्रयत्न केले, प्रचंड मेहनत घेतली आणि अनामप्रेमने मला भक्कम साथ दिली त्यामुळे हे यश मला आज मिळत आहे."

कल्पनाने मिळवलेले यश ही फक्त एका मुलीची गोष्ट नाही, तर ती दृढनिश्चय, अपार मेहनत, समाजासाठी काहीतरी करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती असलेल्या आणि ध्येयासाठी समर्पित व्यक्तीची कथा आहे. अपंगत्व असूनही तिच्या आत्मविश्वासाने, चिकाटीने आणि सेवाभावाने ती आज अनेकांसाठी प्रेरणास्त्रोत ठरत आहे.






Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM SKILL DEVELOPMENT CENTRE
# UDYOG BHAVAN

# Anamprem Products



## Napkin bouquet

"दिव्यांग बांधवांनी तयार केलेले नॅपकिन बुके विक्रीसाठी उपलब्ध – त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या, आणि विशेष उपक्रमात सहभागी व्हा!"

## Gir Cow Lonkadh Ghee

अनामप्रेम संस्थेच्या गोशाळेत पारंपरिक पद्धतीने तयार केलेले शुद्ध तूप आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.




## Sathi chappal udyog

दिव्यांग बांधवांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल – त्यांनी तयार केलेल्या साथी चप्पल विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आपल्या खरेदीतून त्यांना प्रेरणा आणि आधार मिळेल.
कृपया पुढे येऊन हे उत्पादने खरेदी करा आणि त्यांच्या मेहनतीस हातभार लावा!











## Anamprem Crocs

अनामप्रेम परिवारातील दिव्यांग बांधवांची सुंदर निर्मिती – क्रॉक्स आता विक्रीसाठी उपलब्ध..!
आपल्या खरेदीतून त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या.
स्वावलंबनाच्या या प्रवासात सहभागी व्हा!



## Bahuguni Anamamrut

अनामप्रेम संस्थेचे "अनामामृत बहुगुणी थेंब" आता विक्रीसाठी उपलब्ध!
दिव्यांग बांधवांनी तयार केलेले... नैसर्गिक, सुरक्षित आणि बहुगुणी!
उपयोग:
सर्दी, खोकला, कफ, अपचन, दाढदुखी यावर गुणकारी
माऊथ फ्रेशनर म्हणूनही उत्तम!
आरोग्यवर्धक थेंब... सेवाभावातून तयार!





## Sanitary Pad

स्वच्छतेची काळजी, सन्मानाची साथ..!
अनामप्रेम संस्थेच्या उद्योग भवनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेले सॅनिटरी पॅड्स आता विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आहेत. हे पॅड्स सुरक्षित आणि आरोग्यदायी असुन स्त्रियांसाठी त्यांची खरीखुरी सखीच आहेत. स्वावलंबनाचं प्रतीक!



अनामप्रेम दिव्यांग निर्मित उत्पादने मिळवण्याकरिता व अधिक माहितीसाठी संपर्क -7350013805

www.anamprem.org

Scanned with OKEN Scanner




## ANAMPREM CONTACT & BANK DETAILS

- **Himmat Bhavan Project - 7350013806 , 9011004576**
- **S.J Gram Project - 7350517778 , 9011670123**
- **Marathwada Project. - 9921509199 , 9011750035**
- **Anamprem Pune Hostel. - 9422307116 , 9011750022**

| | |
|---|---|
| बँकेचे नांव Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India |
| शाखा Branch | अहमदनगर (महा) Ahmednagar (MH) |
| खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM
10252110@cbin

**हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.**

**/ANAMPREM**

YOU TUBE INSTAGRAM FACEBOOK

@ANAMPREM_2005

Scanned with OKEN Scanner